लोकमत

# प्रशिक्षणातूनच सहकार चळवळ मजबूत

## एम. एल. चौगुले : गडहिंग्लजला 'रवळनाथ'तर्फे सहकार स्नेहमेळावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज :** सहकार चळवळ अधिक मजबूत होण्यासाठी सहकारी संस्थांचे पदाधिकारी, संचालक, सभासद व कर्मचारी यांच्यासाठी प्रशिक्षण शिबिरे घेतली जातील, अशी घोषणा रवळनाथ हाउसिंगचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी केली.

अ. भा. सहकार सप्ताहानिमित्त आयोजित स्नेहमेळाव्यात ते बोलत होते. विनोद नाईकवाडी म्हणाले, आयकर व जीएसटीसंदर्भात येणाऱ्या नोटिसांमुळे पतसंस्थाचालक हैराण झाले आहेत. त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे. दयानंद पाटील, विश्वनाथ चव्हाण, विश्वास देवाळे, राजेंद्र खोराटे, शिवाजी ककडे, सुनील हत्ती, रफिक पटेल, आझाद शेख, गुलाबराव पाटील, राजेश पाटील, सतीश रेडेकर, आदींनी मनोगत व्यक्त केले.




गडहिंग्लज येथील स्नेहमेळाव्यात एम. एल. चौगुले यांनी मार्गदर्शन केले. यावेळी रामचंद्र निळपणकर, विजयकुमार घुगरे, दत्तात्रय मायदेव उपस्थित होते.

महेश मजती, मनोहर पुजारी, कृष्णा पाटोळे, आप्पासाहेब गायकवाड, श्रीकांत महाजन, सिद्धेश्वर माळगी, बाबूराव मास्तोळी, यल्लाप्पा नाईक उपस्थित होते. दत्तात्रय मायदेव यांनी स्वागत केले. रामचंद्र निळपणकर यांनी प्रास्ताविक केले. दत्ता पाटील यांनी समालोचन केले. मीना रिंगणे यांनी सूत्रसंचालन केले. विजयकुमार घुगरे यांनी आभार मानले.